पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

---

# वार्तापत्र

दिनांक :- १७/०३/२०२१

## गडचिरोली पोलीस दलाच्या आस्थापनेवरील ०८ पोलीस उपनिरीक्षकांची सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर तर एका सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकाची पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती

गडचिरोली पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस उपनिरीक्षकपदी कार्यरत असलेल्या १) पोउपनि-मोतीराम बक्काजी मडावी २) पोउपनि. शिवहरी रमेश सरोदे ३) पोउपनि. योगिराज रामदास जाधव ४) पोउपनि. राहुल बाळासो नामदे ५) पोउपनि. योगेश देवराव पाटील ६) पोउपनि. रोहित रमेश फार्णे ७) पोउपनि. सचिन भगवान झनक ८) पोउपनि. तेजस मधुकर मोहिते या ०८ पोलीस अधिकाऱ्यांना नुकतेच सहाय्यक पोलीस निरीक्षक या पदावर तर १) सहा.पोउपनि. नागेशकुमार जागेश्वर टेकाम यांची पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती मिळाल्याने **मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा. यांनी पदोन्नती प्राप्त सर्व पोलीस अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.** पदोन्नती प्राप्त सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्या नेमणुकीच्या ठिकाणी असतांना उल्लेखनिय व वैशिष्ट्यपुर्ण कामगिरी केलेली आहे. या कामगिरीची दखल घेत त्यांना पदोन्नती बहाल करण्यात आलेली आहे. सदर अधिकाऱ्यांनी गडचिरोली पोलीस दलात रुजु झाल्यापासुन आतापर्यंत दिलेल्या सेवेबद्दल गडचिरोली पोलीस दलाचे वतीने त्यांचे मा. पोलीस अधीक्षक सा. यांनी कौतुक केले असुन येणाऱ्या काळात त्यांच्या पुढील सेवेकरीता शुभेच्छा दिल्या आहेत.